
# विश्व पांथस्थ

अनिवासी भारतीयांसाठी पहिले मराठी मासिक **VISHWA PANTHASTHA**

वर्ष १० | अंक १ | मार्च २०२५ | मूल्य ₹ १०० | AED 10 | USD 2 | www.panthastha.com



पांथस्थ फार्म स्टे पुण्यापासून १४० किमी. विठ्ठलवाडी. शांत निसर्ग. विविध झाडे.
पक्षी. वेगवेगळी शेती. पायवाट. तुम्ही व तुमच्या कुटुंबासाठी. दोन दिवस सवडीने
निसर्गाच्या सानिध्यात येऊन राहण्यासाठी. पांथस्थ फार्म स्टे. काहीच करू नका.
फक्त निसर्गासोबत राहा. अवलोकन करा.
सगळ्यात सुंदर वेळ म्हणजे पहाटेची व सायंकाळची.
नयनरम्य सूर्योदय व सूर्यास्त अनुभवा.



Panthastha Farm Stay
140 km from Pune. Vitthalwadi.
Peaceful nature. Trees. Birds.
Various farms around. The trail.
You and your family.
Come and stay
at Panthastha Farm Stay for
two days to get close
to the nature.
Do Nothing Just be with
the nature. Observe.
The most beautiful time
is the morning and the evening.
Experience the picturesque
sunrise and sunset.

Two other options are also available.
At Dongarwadi, at the end of Tamhini Ghat,
70 km from Pune and
other option is near Raigad.

**Contact:**
farmstay@panthastha.com
WhatsApp 8349331708

विश्व पांथस्थ

अनिवासी भारतीयांसाठी पहिले मराठी मासिक VISHWA PANTHASTHA

# अनुक्रमणिका


१. संपादकीय - प्रश्न स्थलांतरितांचे

२. लिस्बन, पोर्तुगाल - संजय दाबके

३. अमेरिका में महत्वपूर्ण भारतीय

४. भारतातील घुसखोर - प्रश्न व संभाव्य उपाय

५. रिमोट वर्किंग - डिजिटल नोमॅड व्हिसा

६. कुठेही रहा, डॉलरमध्ये कमवा - महत्वाच्या साईट्स



विश्व पांथस्थ
वर्ष १० । अंक १
मार्च २०२५

अनिवासी भारतीयांसाठीचे पहिले मराठी मासिक

संपादक
संदीप वसंतराव कडवे

संपादकीय व वितरण साहाय्य
राजन ताबडे, अबू धाबी
धवल नांदेडकर, फुजेरा
देविका घोरपडे, इंदौर
डॉ.नितीन गायकवाड, औरंगाबाद

मुखपृष्ठ आणि सजावट
विश्व पांथस्थ

मूल्य ₹ 100 | AED 10 | US$2

Vishwa Panthastha
Year 10 Issue 1
March 2025

First Marathi Monthly For NRIs

Editor
Sandeep Vasantrao Kadwe

Editorial & Distribution Support
Rajan Tawde. Abu Dhabi
Dhawal Nandedkar, Fujerah
Devika Ghorpade - Indore
Dr. NitinGaikwad-Aurangbad

Cover & Design
VISHWA PANTHASTHA

Price ₹ 100 | AED 10 | US$2

विश्व पांथस्थ हे मासिक मालक, मुद्रक व प्रकाशक संदीप वसंतराव कडवे यांनी ए-७०३, निसर्ग सिटी -२, कस्पटे वस्ती, वाकड, पुणे - ४११०५७. येथे प्रसिध्द केले.
**संपादक - संदीप वसंतराव कडवे**
**(पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी)**

Vishwa Panthastha' monthly publication is owned, printed & published by Sandeep Vasantrao Kadwe. and published at A-703, Nisarg City-2, Kaspate Vasti, Wakad, Pune - 411 057.
Mob.: +91 9860678844
e-mail: editor@panthastha.com
website: www.panthastha.com
Editor - Sandeep Vasantrao Kadwe
(Responsible for Selection of News & Articles under the PRB Act.)



या अंकातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# संपादकीय



# प्रश्न स्थलांतरितांचे

**- डॉ. संदीप कडवे**

नोव्हेंबर २०२४ मध्येच अमेरिकेने अमेरिकन सिटीझन नसलेल्या, अमेरिकेत बेकायदा वास्तव्य करत असलेल्या १४,४५,५४९ जणांची यादी तयार केली होती, त्यात मेक्सिकोचे २५२,०४४ व एल साल्वाडोर चे २०३,८२२, चीन चे ३७,९०८, भारताचे १७,९४०, बांगलादेशचे ४,८३७, नायजेरियाचे ३,६९०, ऑस्ट्रेलियाचे २६२, फिनलँडचे २२, फ्रांस चे ४०२, जपानचे २८१ असे १०० पेक्षा जास्त देशांचे नागरिक सामील होते. म्हणजे भारत याबाबतीत अपवाद नव्हता. २० जानेवारी २०२५ रोजी अध्यक्षपदाचा पदभार घेताच ट्रम्प यांनी मास डिपोर्टेशनचा धडाका सुरु केला. ५ फेब्रुवारी २०२५ मध्ये १०४ भारतीयांना घेऊन आलेले अमेरिकेच्या संरक्षणदलाचे विमान अमृतसर विमानतळावर उतरले व भारताच्या सार्वभौमत्वाचे तत्क्षणी धिंडवडे निघाले. या १०४ मध्ये ३० जण पंजाबचे, ३३ हरयाणाचे, ३३ गुजरातचे, ३ महाराष्ट्राचे, ३ उत्तर प्रदेशचे, २ चंदीगडचे होते. त्यांना पायात बेड्या, हातात बेड्या, या स्थितीत जवळपास उपाशीपोटी भारतात आणले गेले. त्यानंतर ११९ व ११२ भारतीयांना घेऊन येणारे दोन विमाने पुन्हा अमृतसरला उतरली. आतापर्यंत ३३५ भारतीयांना अमेरिकेतून भारतात परत पाठवले आहे. उरलेले १७,६०५ भारतीय अवैधरित्या अमेरिकेत राहत असल्याचा अमेरिकेचा आरोप आहे. आता ते कधी व कसे भारतात परत पाठवले जातील हे भारताच्या हातात बहुधा राहिले नाही. परराष्ट्र खात्यात हयात घालवलेल्या व सध्या परराष्ट्र मंत्री पदावर असलेल्या जयशंकर यांना अमेरिकेच्या अध्यक्षीय निवडणुकीपूर्वी अमेरिकेत जाऊन राहून देखील या गोष्टीचा अंदाज आला नसेल तर त्यांना परराष्ट्र धोरण कळले नाही किंवा ते राबवता आले नाही असाच त्याच अर्थ होतो. असेही नाही कि ट्रम्प सरकारात भारतीय वंशाचे अधिकारी नाहीत, किंबहुना अनेक महत्वाच्या पदावर भारतीय वंशाचे नागरिक आहेत (उदाहरणार्थ काश पटेल - FBI Director, ट्रम्प गव्हर्नमेंट). पण त्यांचेही सहकार्य या साठी मिळवता आले नाही? घुसखोरांना परत पाठवणे समजू शकते, परंतु ज्या प्रकारे मानहानी करून त्यांना परत पाठवले आहे, ते आक्षेपार्ह आहे. हा त्या भारतीयांचाच फक्त अपमान नाही तर देशाचा अपमान आहे. अनेकांचे असेही म्हणणे आहे कि सुषमा स्वराज आज परराष्ट्र मंत्री असत्या तर चित्र नक्की वेगळे दिसले असते. ट्रम्प एक विवादास्पद व अनाकलनीय व्यक्तिमत्व आहेच. त्यांना अमेरिकेतून व जगभरातून टीकेला सामोरे जावे लागणार आहे, लागत आहे, त्या टीकाकारांमध्ये पोप सारखे धार्मिक नेते देखील सामील आहेत. ट्रम्पचे अनेक निर्णय कालांतराने अमेरिकेच्या हिताविरुद्ध आहेत हे सिद्ध होईलच, पण आज या घडीला त्यांनी जे केले ते पुसून टाकता येणार नाही. १४ फेब्रुवारी पर्यन्त पंतप्रधान अमेरिकेच्या दौऱ्यावर होते, तिथे त्यांना भारतासाठी विशेष काही मिळाले असे वाटत नाही. अन मिळाले तरी जो बुंदसे गयी, वो हौद से क्या आयेगी.

अमेरिकेपाठोपाठ ब्रिटनने देखील तेथे अनधिकृत पणे राहणाऱ्या परदेशी नागरिकांना तातडीने देशातून बाहेर काढण्याचे जाहीर केले आहे. त्यात किती भारतीय आहेत हे अजून कळले नाही. इतर देशांनीही अशीच घोषणा केली तर आता आश्चर्य वाटून घेऊ

नये. आपल्याला देशात राहणाऱ्या घुसखोरांवर, अनधिकृत लोकांवर कारवाई करणे हा त्या त्या देशाचा अधिकार आहे. तो तसा अधिकार भारताचाही आहे, पण भारताने अजून तरी या बाबतीत राजकीय फायद्यासाठी वेळकाढू पणाचे धोरण स्वीकारले आहे. असे धोरण म्हणजे या देशात म्हणजे भारतात अधिकृत पणे राहून, प्रामाणिक पणे कर भरून, देशाच्या कायद्यानुसार वागून यंत्रणेला सहकार्य करणाऱ्या सर्व पापभिरू नागरिकांवर अन्यायच आहे. आता अमेरिकेच्या व ब्रिटनच्या पावलावर पाऊल ठेऊन भारतानेही भारतातील सर्व घुसखोर, मुख्यतः बांगलादेशी, बाहेर काढावे. त्यांना आश्रय देणाऱ्या सर्वांना कायद्यानुसार सजा द्यावी व अन्य भारतीयांच्या हिताचे रक्षण करावे.

२०१४ पासून पुढे प्रामुख्याने NRI चा राजकीय कारणाकरता वापर करण्याचे, परदेशात जाऊन पंतप्रधानांनी NRI चे मोठे मोठे मेळावे घेऊन देशभक्तीचे प्रचंड प्रदर्शन करण्याचे प्रकार प्रचंड बळावले. हे नवीनच होते. NRI नी स्वकर्तृत्वावर परदेशात जाऊन आपले स्थान निर्माण केले, आर्थिक सुबत्ता कमवली, जगात मानसन्मानाची पदेही मिळवली, त्यासाठी कित्येक पिढ्या खर्ची पडल्या. हे सर्व भारत सरकार किंवा बीजेपी पुरस्कृत उमेदवार नव्हते. परंतु सरकारला, पेक्षा नेत्याला यांच्या यशाचे श्रेय घेण्याची घाई झाली होती. प्रामुख्याने अमेरिकेत याचा अतिरेक झाला. कॉन्सुलेट व एम्बसी मध्ये धार्मिक व राजकीय उन्माद पसरवणाऱ्या लोकांनी जरुरीपेक्षा जास्त हस्तक्षेप केला. फक्त NRI साठी म्हणून भाजप ने एक पक्षीय यंत्रणा उभारली. सुरवातीला असंख्य NRI ना हे सर्व भव्य, दिव्य, अलौकिक वाटले. परंतु आपला फक्त वापर करून घेतला जातो आहे हे जेव्हा त्यांच्यातीलच काहींना कळाले तेव्हा ते सावध झाले. ब्रिटनमध्ये स्थानिक इंग्रजांपेक्षा भारतीय वंशाच्या लोकांनी सर्वात जास्त प्रॉपर्टी खरेदी केली आहे अशी बातमी वाचली, त्याचा दिंडोरा पिटला गेला. आता अमेरिकेत व ब्रिटन मध्ये राहणाऱ्या लक्षावधी भारतीय व भारतीय वंशाच्या अमेरिकन व ब्रिटीश नागरिकांना इतर अमेरिकन व ब्रिटिश नागरिकांच्या विद्वेषाला सामोरे जावे लागतात आहे. भारतीय वंशाच्या इतर देशातील नागरिकांना देखील याची झळ पोहचायला सुरवात झाली आहे. पूर्वी ज्यु वंशाच्या लोकांनी जगभर जाऊन आपले मोठे आर्थिक साम्राज्य उभे केले. पण ते इतरांच्या नजरेत आले. जर्मनीतील तथाकथित राष्ट्रवादी प्रेरणेने पछाडलेल्या भोंदू राजकारण्यांनी याचेच भांडवल करून त्यांच्या विरुद्ध देशात, समाजात तिरस्कार निर्माण केला. त्याचा परिणाम थेट महायुद्धात झाला. जगभरच्या भारतीयांना राजकीय हेतुकरता वेठीस धरण्याचे परिणाम आता काय होतील याची भविष्यवाणी करता येत नसली तरी अंदाज करता येतो. वरील लिस्ट मध्ये चीन चे नागरिक देखील मोठ्या संख्येने अमेरिकेत आहेत, पण त्यांच्या विरुद्ध अशा प्रकारची कारवाई अमेरिकन सरकारने केली नाही, यातच सगळे आले.

स्थलांतरितांचे प्रश्न स्थलांतरितांचे प्रश्न नोकरशाही व सरकार यांच्या समन्वयातून सोडवले जाऊ शकतात. प्रत्येक देशात असलेल्या कॉन्सुलेट व एम्बसी चे काम फक्त राजकीय अथवा खाजगी दौरे काढणाऱ्या नेत्यांची व्यवस्था बघणे, १५ ऑगस्ट व २६ जानेवारीला झेंडावंदन करणे, गेलाबाजार तेथील हॉल सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी भाड्याने देणे इतकाच राहिला आहे का? अशी शंका यावी इतपत परिस्थिती खालावलेली दिसते.

युद्धजन्य परिस्थितीतून येमेन व युक्रेन येथून भारतीयांना परत आणणे हे दोन अपवाद मानावे लागतील. कोरोना काळात यु ए इ व इतर देशांतून अडकलेल्या भारतीयांना परत आणण्यास तर तेव्हाच्या केंद्र व राज्य सरकारने सपशेल नकार दिला होता. यु ए इ च्या भारतीय राजदूतांनी भारतात विमान लँड करण्याची परवानगी मागितली, ती देखील दिली नाही. काही निवडक भारतीयांनी पूढाकार घेऊन खाजगी व वैयक्तिकरित्या केलेल्या प्रयत्नांमुळे व पाठपुराव्यामुळे हजारो अडकलेले भारतीय नागरिक खाजगी चार्टर्ड विमानाने स्वखर्चाने भारतात आले. भारतात आल्यावरही भारतातील स्थानिक नागरिकांनी दिलेल्या द्वेषपूर्ण व तिरस्कारपूर्ण वागणुकीला त्यांना सामोरे जावे लागले. नुकत्याच अमेरिकेने स्वतःच्या संरक्षण खात्याच्या विमानाने अमेरिकेत बेकादेशीर पणे राहणाऱ्या भारतीयांना भारतात परत पाठवले, त्यात कुणी भारताचे भाड्याचे पैसे वाचले अशी शेखी मिरवली, तर

हे नेहमीचेच व सर्वसाधारण आहे अशी टिप्पणी खुद्द परराष्ट्र मंत्र्यांनी केली, यापेक्षा दुर्दैवी गोष्ट काय असावी. सर्वसाधारण भारतीयांची छठ्ख प्रति असलेली द्वेषपूर्ण भावना आजही सोशल मीडिया वरील ट्रोलिंग च्या रूपाने समोर येते आहे. दुर्दैवी आहे.

रीतसर वैध मार्गाने शिक्षणासाठी, नोकरीसाठी, पर्यटनासाठी, बिझनेससाठी परदेशी (अमेरिका व पूर्ण जगात) जाणाऱ्या भारतीयांची संख्या कमी नाही. पण ते उच्चशिक्षित असतील, त्याच्या कडे संसाधने, पैसे वगैरे असतील. डंकी रूट किंवा डाँकी रूट या नावाने कुप्रसिद्ध झालेल्या मार्गाने परदेशात, मुख्यतः अमेरिकेत जाणारे भारतीय हे मुख्यतः अशिक्षित, परिस्थितीने गांजलेले, भारतातील राजकीय अतिरेक, जातीयवाद, सामाजिक अराजकता व विषमतेला कंटाळलेले, बेरोजगारीची झळ सोसणारे व एजन्टच्या भूलथापांना बळी पडलेले असतात. किंवा त्यातील काही गुन्हेगारी प्रवृत्तीचे देखील असतील. मुळातच या डाँकी रूट ने आपले घरदार विकून, जीवावर उदार होऊन परदेशात जाण्याची वेळ या अशिक्षित किंवा अर्धशिक्षित भारतीयांवर का येते? भारतात त्यांना रोजगार का निर्माण करता येत नाही? भारतात राहून त्यांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालावा इतकेही उत्पन्न त्यांना का मिळत नाही? आणि त्यांना परदेशात जायचे असेल तर त्यासाठी सरकारी यंत्रणा त्यांना कायदेशीर मार्गाने परदेशात पाठवण्यासाठी मदत का करू शकत नाही? त्यांना समाजात उघडपणे वावरणाऱ्या एजन्ट्स पासून इतकी मोठी पोलीस यंत्रणा का थांबवू शकत नाही? इतके होऊन ते जरी परदेशात गेले तरी त्याची तिकडे ससेहोलपट होते, त्यांना पिळून काढले जाते व ते ना कायद्याची मदत घेऊ शकत ना कुठल्या एनजीओ ची मदत घेऊ शकत.

मागील वर्षी महाराष्ट्र सरकारने अकुशल, अर्धकुशल व कुशल कामगारांना जर्मनीत पाठवण्यासाठी एक योजना आणली होती. त्याची प्रचंड जाहिरातबाजी केली होती. त्याचे पुढे काय झाले माहित नाही.
सद्य स्थितीत अमेरिकाचा विचार करता, डोनाल्ड ट्रम्प यांच्या इमिग्रेशन धोरणांचा अनिवासी भारतीयांवर (एनआरआय) विशेषत: एच-१बी व्हिसाधारकांवर लक्षणीय परिणाम झाला आहे. येथे काही महत्त्वाचे मुद्दे आहेत:

**१. एच-१बी व्हिसा आव्हाने** : ट्रम्प प्रशासनाने कठोर नियम लागू केले आणि एच -१ बी व्हिसा अर्जांची तपासणी वाढविली. यामुळे अमेरिकेत रोजगारासाठी या व्हिसावर अवलंबून असलेल्या भारतीय व्यावसायिकांमध्ये अनिश्चितता आणि चिंता निर्माण झाली आहे.
**२. जन्मसिद्ध नागरिकत्व** : ट्रम्प यांच्या कार्यकारी आदेशांपैकी एक म्हणजे अस्थायी रहिवाशांच्या मुलांचे जन्मसिद्ध नागरिकत्व संपुष्टात आणणे. याचा अर्थ असा आहे की एच -१ बी व्हिसाधारकांकडून अमेरिकेत जन्मलेल्या मुलांना आता आपोआप अमेरिकेचे नागरिकत्व मिळणार नाही. या धोरणात्मक बदलामुळे अमेरिकेत राहणाऱ्या भारतीय कुटुंबांवर ताण वाढला आहे.
**३. ग्रीन कार्ड बॅकलॉग** : ग्रीन कार्ड अर्जांचा बॅकलॉग लक्षणीय वाढला असून, अनेक भारतीय व्यावसायिक कायमस्वरूपी वास्तव्यासाठी दशकभर वाट पाहत आहेत. या प्रदीर्घ प्रतीक्षेमुळे कुटुंबांना स्थैर्य प्राप्त होण्यापासून आणि अमेरिकेमध्ये पूर्णपणे विलीन होण्यापासून रोखले गेले आहे
**४. भारतात परतणे** : ट्रम्प यांच्या धोरणांमुळे निर्माण झालेल्या अनिश्चितता आणि आव्हानांमुळे काही अनिवासी भारतीयांनी भारतात परतण्याचा विचार केला आहे. यामुळे मालमत्तेचे लिक्विडेशन करून भारतात पैसे परत पाठविण्याचा ट्रेंड वाढला आहे.
**५. कायदेशीर आणि सामाजिक परिणाम** : या धोरणांमुळे मानवी हक्क संघटनांकडून कायदेशीर आव्हाने आणि टीकेची झोड उठली आहे. समीक्षकांचा असा युक्तिवाद आहे की ही धोरणे अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेतील कुशल स्थलांतरितांचे योगदान कमी करतात. एकंदरीत, ट्रम्प यांच्या इमिग्रेशन धोरणांमुळे अनिवासी भारतीयांसाठी एक गुंतागुंतीचे आणि आव्हानात्मक वातावरण तयार झाले आहे, ज्यामुळे त्यांच्या करिअर योजना, कौटुंबिक स्थैर्य आणि अमेरिकेतील दीर्घकालीन वास्तव्याच्या शक्यतांवर परिणाम झाला आहे.

फक्त अमेरिकेचा विचार न करता, जगभरच्या अनिवासी भारतीयांचे व स्थलांतरितांचे मुख्य प्रश्न खालीलप्रमाणे मांडता येतील.

**१. कायदेशीर व्हिसा मिळवणे -** यासाठी त्यांना सर्वप्रथम त्या त्या देशातील शिक्षणाच्या अथवा नोकरीच्या अथवा बिझनेस च्या संधी समजवून घ्याव्या लागतात. यातही फसव्या जाहिराती टाळून, लुटारू एजंट्स टाळून, वैध मार्गाने व्हिसा मिळवणे यासाठी एक सक्षम यंत्रणा आजही उभी राहू शकली नाही. सोशल मीडिया च्या माध्यमातून, इतर वैयक्तिक संपर्कातून मग भारतीय विद्यार्थी, कामगार, नोकर वर्ग, बिझनेसमन मग हि माहिती गोळा करतात, आपापल्या कुवतीनुसार संधी शोधतात व ९०%+ लोकं वैध मार्गाने परदेशात जातात. परदेशात जाणे गैर नाही, पण त्यांना योग्य मदत करणारे फार हात पुढे येत नाही हे तितकेच खरे. स्टुडंट व्हिसावर अमेरिका, ब्रिटन व ऑस्ट्रेलिया ला जाणे सर्वात सोपे परंतु खर्चिक असते. हे सर्व स्टुडंट्स भारतात कर्ज काढून परदेशात जातात याचे मुख्य कारण म्हणजे त्यांना नंतर तिकडेच नोकरी करून स्थायिक व्हायचे असते. डिग्री महाग असते, पण स्टुडन्ट व्हिसा नंतर वर्क व्हिसा मध्ये कॉन्व्हर्ट होतो. भारतातून वर्क व्हिसा मिळणे अवघड असते. पण आता अमेरिकेला, ब्रिटनला, ऑस्ट्रेलियाला भली मोठी फीस देऊन शिक्षणासाठी येणारे स्टुडंट्स तर हवे आहेत, पण शिक्षण पूर्ण झाल्यावर त्यांना वर्क व्हिसा व त्या देशाचे नागरिकत्व देण्याची त्यांची इच्छा नाही, अशी परिस्थिती येत आहे.

**२. कमी वेतन -** बहुसंख्य कामगार व काही उच्च शिक्षित देखील फसव्या जॉब ऑफर लेटर वर भरोसा ठेवून व्हिसा, विमान प्रवास तिकीट वगैरे देऊन परदेशात जातात व तिथे गेल्यावर लक्षात येते कि, ज्या जॉबसाठी परदेशात आणले गेले आहे, तो जॉब देतच नाही, पण कुठलातरी दुसराच जॉब, कमी वेतन त्यांना देऊन काही वेळा तर अक्षरशः वेठबिगाऱ्यासारखे वागवले जाते. जाणारा मजबूर असतो. भारतात कर्ज काढले असते, कौटुंबिक जबाबदाऱ्या असतात, पैश्याची फार फार गरज असते, म्हणून मग जे मिळेल ते काम स्वीकारून छळाला फसवणुकीला सामोरे जातात. बहुसंख्य जण टिकतात, काही नाही टिकत, मग ते आत्महत्या देखील करतात व अक्षरशः बेवारश्यासारखे परदेशात मरण पावतात. त्याची इथल्या मीडिया मध्ये फार चर्च होत नाही. कुणाच नक्की काय झाले याचा पत्ता लागत नाही. हा प्रश्न खरंच गंभीर आहे.

**३. स्थानिक वातावरणाशी जुळवून घेण्यासाठी लागणारा वेळ व अडचणी -** भाषेची अडचण, स्थानिक कायदे माहित नसणे, घर भाड्याने घेतले असल्यास घरमालकाकडून होणारी फसवणूक, योग्य फर्निचर नसणे, गरम कपडे नसणे, घरात अत्यावश्यक हिटर अथवा ए सी नसणे, स्वतःचे वाहन नसणे, त्यासाठी स्थानिक ड्रायविंग लायसन्स घेण्यासाठी प्रचंड खर्च करणे, गाडी घेण्यासाठी पुरेसे पैसे नसणे या सर्व सुरवातीच्या अडचणी असतात, त्याला परदेशात जाणारे सर्वच भारतीय तोंड देतात.

**४. आर्थिक अडचणी -** परदेशात इन्शुरन्स ला व आर्थिक साक्षरतेला फार महत्व आहे. असंख्य भारतीय याबद्दल अनभिज्ञ असतात. एकदा जरी आजारी पडले व इन्शुरन्स नसला तर प्रचंड आर्थिक बोजा पडतो. आर्थिक मिळकत व खर्च यांचा मेळ बसत नाही व मग क्रेडिट कार्ड वर जास्त व्याजाने पैसे उचलणे, इतर कर्ज काढणे, कमीत कमी खर्चात राहण्याची सवय लावून घेणे, उदाहरणार्थ घरीच जमेल तसा स्वयंपाक करणे, स्वस्तातील शॉपिंग करणे, मंदिरात जाऊन जेवण करणे, बंगल्याच्या तळघरात राहणे, शेअरिंग मध्ये राहणे, मुख्य जॉब शिवाय इतर पार्ट टाइम जॉब करणे, असे अनेक मार्ग अवलंबले जातात. त्याचा त्यांच्या शारीरिक व मानसिक स्वास्थ्यावर प्रतिकूल परिणाम होतो. तरीही कर्जाच्या गर्तेत बरेच जण अडकतात. आर्थिक रित्या असक्षम अनिवासी भारतीय हा तेथील इतर श्रीमंत भारतीयांमध्ये अथवा नागरिकांमध्ये फारसा मिळून मिसळून राहू शकत नाही, त्यामुळे त्याला एकटेपण येते, मानसिक ताणतणाव येतात, इतर कुणी जवळचे बरोबर नसले तर हे सर्व वाढतच जाते व वर वर्णन केल्याप्रमाणे अनेक जण आत्महत्येचा मार्ग पत्करतात. काही जण कुठल्यातरी रॅकेट मध्ये अडकतात. हा देखील खूप मोठा प्रश्न आहे.

**५. कौटुंबिक समस्या -** बॅचलर किंवा स्पिन्स्टर यांचे प्रश्न वर मांडले आहेत. त्यांचे लग्न जमवणे हा देखील एक मोठा प्रश्न आहेच. पण ज्यांचे लग्न झाले आहे, त्याचे प्रश्न देखील खूप आहेत. लग्न करून येणारे जोडपी दोन प्रकारची असतात. फक्त नवरा काम करतो, या स्थितीत पद व पगार चांगला असेल तर घर गाडी खर्च याची चिंता नसते. परंतु बरेच ठिकाणी अशी जोडपी देखील त्यांच्यावर असलेले कर्ज, भाड्याच्या घरातून स्वतःच्या घरात जाणे, मॉर्गेज, या सर्व प्रकारामुळे महिला देखील काम शोधते व काम करू लागते. मग मुले होऊ देणे अडचणीचे ठरते, मुले असलीच तर त्यांना सांभाळणे अडचणीचं ठरते. भारतातुन मुलीचे किंवा मुलाचे आई वडील आले तर मुलांना बेबी सिटींग चा प्रश्न मिटतो. पण तो ही तात्पुरता असतो, बहुधा बाळंतपणात पालक आणले जातात, कारण त्या देशाचे नागरिकत्व मुलांना मिळावे म्हणून प्रसूती त्या त्या देशातच केली जाते. पालक भारतात परतल्यावर मग कसरत सुरु होते. तिथे धुणेवाली, भांडीवाली असा प्रकार नाही, घरकामात कुणी मदत करत नाही, छोटी छोटी कामे स्वतःच करावी लागतात, मुलांना एकटे सोडता येत नाही, वगैरे असंख्य प्रश्न असतात. मुलांचे शिक्षण काही ठिकाणी +१० पर्यंत फार कमी खर्चात होते, परंतु त्यानंतर खर्च असतो. तेथील सामाजिक चालीरीतीनुसार मुले मोठी होतांना भारतीयत्वाची ओळख, संस्कार पुसले जातात, मॉडर्न संस्कार मग कुठल्या थरापर्यंत जातील ते सांगता येत नाही. भारतात परतणे शक्य नसते. मग स्थानिक मंडळातील कार्यक्रम, भारतातून आयात केलेले सांस्कृतिक कार्यक्रम, कलाकार, वगैरे यांच्या भरोशावर कुठेतरी भारतीयत्व जपण्याचा प्रयत्न केला जातो. भारतात ही मंडळी आल्यास त्यांना भारतातील सामाजिक स्थिती, भ्रष्टाचार, गर्दी, अव्यवस्था, वगैरे पाहून प्रचंड भ्रमनिरास होतो व ज्यांना शक्य असते ते ७-८ दिवसातच भारतातून आपापल्या देशात परततात. आई, वडील यांच्या निधनानंतर भारतात देखील येत नाही. भारतातील जमीन, जुमला, संपत्ती याची थोडीफार व्यवस्था लावली जाते, मुली असतील तर हक्क मागून वारसा संपत्तीची विल्हेवाट लावून, पैसे गाठीला बांधुन परदेशात निघून जाण्याची प्रवृत्ती असते. अशा एनआरआय चे परदेशात निधन झाले तर मग तिथे उरलेल्या जोडीदाराला मग फार एकटेपण येते. तो जर अमेरिकन अथवा त्या देशाचा नागरिक नसेल तर त्याची बॉडी भारतात आणणे हे देखील अत्यंत कठीण काम असते. त्यातही मग REDIO (Rescuing Every Distressed Indian Overseas) यासारख्या NGO भारतातून मदत करतात. अनेकांना मृत्युपत्रानुसार आपल्या संपत्तीचे वाटप करता येत नाही, कारण स्थानिक कायदे माहित नसतील तर धड मृत्युपत्र देखील केलेले नसते. या सर्वात मग स्थानिक मंडळ, मित्र, असे कोणीतरी मदत करते. ते हि नसतील तर मग अवस्था वाईट होते.

**६. वंशविद्वेष -** भारतात जातीय धार्मिक विद्वेष केला जातो, परदेशात वंशविद्वेष केला जातो. अनेक भारतीयांना याला तोंड द्यावे लागते.

अनिवासी भारतीयांच्या किंवा भारतीय वंशाच्या व्यक्तींच्या या सर्व किंवा या पेक्षा अधिक व अनेक अडचणी आहेत. देशानुसार त्या बदलतात. त्या त्या देशाचे नागरिक असतील तर ते देश या नागरिकांची त्याच्या कायद्यानुसार, व्यवस्थेनुसार काळजी घेतात. पण ज्यांनी त्या देशाचे नागरिकत्व घेतले नाही असे भारतीय पारपत्र धारक म्हणजे पासपोर्ट होल्डर, जे अधिकृत भारतीय नागरिक आहेत, त्याची जबाबदारी मात्र भारत सरकारचीच असते. वरील प्रश्न कॉन्सुलेट वा एम्बसी वा मिनिस्ट्री ऑफ एक्सटेर्नल अफेअर यांना माहित नाही असे नाही, पण त्याच्या तर्फे एक सक्षम यंत्रणा आजही ७५ वर्षानंतर का उभी केली गेले नाही हा मोठा प्रश्न आहे. स्वयंसेवी संस्थांच्या जीवावरच या भारतीयांना आजही मदत केली जाते हे वास्तव आहे. REDIO हि NGO दोन वर्षांपूर्वी भारतात डॉ.ज्ञानेश्वर मुळे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थापन झाली. सौ.धनश्री पाटील यांनी धडाडीने याची धुरा सांभाळली आहे. पण ही सेक्शन ८ कंपनी आहे. डॉ.मुळे यांच्या गुडविल वर इतर देशातील कॉन्सुलेट एम्बसी थोडीफार मदत करतात. पण प्रत्येक देशात फक्त एन आर आय साठी म्हणून एक डेस्क असते, ते काय काम स्वतःहून करते हा मोठा प्रश्न आहे.

भारत सरकारने या अनिवासी भारतीयांसाठी एक सर्वंकष धोरण ठरवून प्रचंड मोठ्या सरकारी यंत्रणेचा योग्य वापर करून या अनिवासी भारतीयांचे दायित्व घेतले पाहिजे. विश्वगुरू व पाच मिलियन डॉलर अर्थव्यवस्थेची आकांक्षा बाळगणाऱ्या देशाला आपल्याच नागरिकांच्या हितासाठी इतके उदासीन राहून चालणार नाही. भारतासाठी शंभर बिलियन डॉलर पेक्षा जास्त रेमिंटनसेस पाठवणाऱ्या नागरिकांची अशी हेळसांड करून चालणार नाही. याही पलीकडे जाऊन, आंतरराष्ट्रीय पातळीवर

देशाची अशी नाचक्की होणे ही गोष्ट नक्कीच भूषणावह नाही. न्याय, परदेशांशी संबंध व देशाचे संरक्षण या बाबी केंद्र सरकारच्या अख्यत्यारित येतात, केंद्र सरकारने या कर्तव्याचे योग्य निर्वाहन करणे अत्यावश्यक व तातडीचे झाले आहे. सरकारे बदलतील, पंतप्रधान बदलतील, परराष्ट्र मंत्री बदलतील, पण देश कायम राहील आंतरराजीय व आंतरराष्ट्रीय स्थलांतर देखील सदैव चालूच राहील. तेव्हा भारताच्या स्थलांतरितांचे प्रश्न सोडवण्यासाठी पक्षीय भेदभाव विसरून प्रामाणिक व सतत प्रयत्न करणे जरुरी आहे. २०१५ पासून आजवर विश्व पांथस्थ ने अनिवासी भारतीयांचे प्रश्न पंतप्रधान कार्यालय, परराष्ट्र व्यवहार खाते, इलेक्शन कमिशन, अगदी राष्ट्रपती भवनापर्यंत मांडले, काही सोडवले. यापुढेही ते मांडले जातीलच. ते प्रश्न सोडवण्यासाठी जी यंत्रणा, अधिकार लागतो, तो मात्र विश्व पांथस्थ कडे नाही, म्हणून सरकार बरोबर, इतर एन जी ओ बरोबर, इतर देशातील मंडळे व नागरिक यांच्याबरोबर सहकार्याने काम करून हे प्रश्न सोडवण्याची आमची भूमिका होती, राहील. आपले सहकार्य या साठी अपेक्षित आहे हीच प्रार्थना.

**डॉ. संदीप कडवे, पुणे,**
**७ मार्च २०२५**

**FORM IV**

Statement about ownership and other particulars about newspaper VISHWA PANTHASTHA to be published in the first issue every year after the last day of February.

1. Place of publication: A-703, Nisarga City-2, Kaspate Vasti, Wakad, Pune 411 057.
2. Periodicity of its publication: Monthly
3. Printer's Name: Sandeep Vasantrao Kadwe
   Nationality: Indian
   Address: A-703, Nisarga City-2, Kaspate Vasti, Wakad, Pune 411 057.
4. Publisher's Name: Sandeep Vasantrao Kadwe
   Nationality: Indian
   Address: A-703, Nisarga City-2, Kaspate Vasti, Wakad, Pune 411 057.
5. Editor's Name: Sandeep Vasantrao Kadwe
   Nationality: Indian
   Address: A-703, Nisarga City-2, Kaspate Vasti, Wakad, Pune 411 057.
6. Names and addresses of individuals who own the newspaper and partners or shareholders holding More than one per cent of the total capital.
   Sandeep Vasantrao Kadwe
   A-703, Nisarga City-2, Kaspate Vasti, Wakad, Pune 411 057.
   I, Sandeep Vasantrao Kadwe, hereby declare that the particulars given above are true to the best of my knowledge and belief.

Date: 07 March 2025

Sd/-
Signature of Publisher

# लिस्बन, पोर्तुगाल

:- संजय दाबके

कामासाठी बार्सिलोनाला आलो होतो. दिल्लीला जे छत्रपती शिवाजी महाराजांचं म्युझिअम करतोय, त्यात खांदेरी आणि सुरत हि दोन्ही प्रकरणे आहेत.. त्यात ब्रिटिशांबरोबरच डच, स्पॅनिश, फ्रेंच आणि पोर्तुगीझ हे सुद्धा फारच येतात. परवाच बार्सिलोनामध्ये मेरीटाईम म्युझिअम बघितलं. १४९४ ला कोलंबस तिथूनच (म्हणजे त्या म्युझियमच्या समोरच्या बंदरातून) अमेरिकेला पोहोचला.. त्याचे सगळे नकाशे, बोटींची मॉडेल्स तिथे बघायला मिळाली. तसंच वास्को द गामा बद्दलही कुतूहल होत. हा कोलंबस नंतर चारच वर्षांनी, १४९८ ला आफ्रिकेला वळसा घालून भारताच्या किनाऱ्याला लागलेला पहिला युरोपिअन! त्यानंतर सलग १०० वर्षे भारताबरोबरच्या व्यापारावर पोर्तुगीझांच वर्चस्व होतं. 'लिस्बन' हे जगातलं मध्यवर्ती आणि अत्यंत समृद्ध शहर मानलं जात होतं. तिथे भारतातून मसाले आणि कापड, आफ्रिकेतून गुलाम आणि सोनं आणि ब्राझील मधून साखर येत होती.. आपल्या विजयनगरच्या कृष्णदेवराय आणि अच्युतरायाच्या काळात तिथे आलेले 'पेस आणि नुनीझ' हे पोर्तुगीझच!. शिवाजी महाराजांनी आरमार बांधायला ३०० पोर्तुगिझच नोकरीला ठेवले होते. पोर्तुगिझांच्या या कर्तृत्वाचं केंद्र म्हणजे लिस्बन.. त्या सगळ्या मुळे लिस्बनला यायचंच होतं..

बार्सिलोनाहून थोडी वाट वाकडी करून (दीड तसाच फ्लाईट घेऊन) काल लिस्बनला पोचलो. रॉड्रिग्स, सलढाणा वगैरे गोव्याची नावे इथे पुन्हा ऐकायला मिळाली. आज सकाळी इथल्या ऐतिहासिक अश्या बेलेम भागाकडे चालत निघालो. लिस्बनची नदी 'टॅगस' हि इथे अटलांटिक समुद्राला मिळते. इथूनच गामा भारताकडे निघाला. तिथेच मेरीटाईम संग्रहालय आहे. त्यात बरीच ६०० वर्षांपूर्वीचे नकाशे आणि कागदपत्र बघायला मिळाली, पण विशेष म्हणजे 'दीव' ला पोर्तुगीझांनी जो किल्ला बांधला होता त्याचं मातीच मॉडेल बघायला मिळालं.

इथेच शेजारी जेरॉनीमोस मोनास्टरी आहे. तिथे वास्को द गामा चे अवशेष चिरविश्रांती घेत आहेत. त्याचा मृत्यू झाला कोचिनला पण नंतर इतमामाने ते इथे आणून ठेवले आहेत. हात जोडलेला त्याचा देह वर कोरलेला आहे. नदीला लागूनच जे पोर्तुगीझ, 'जगाचा' शोध लावायला बाहेर पडले त्याच एक भव्य स्मारक आहे. आणि अगदी नदी जिथे समुद्राला मिळते तिथे मोहिमांमधून परत येणाऱ्या किंवा जाणाऱ्या जहाजांवर नजर ठेवणारा बेलेम टॉवर.. ६०० वर्षांपूर्वीच इतिहास आज अनुभवला. आपल्या जहाज बांधणीत पहिल्यांदा खिळ्यांचा वापर करायला शिकवला तो पोर्तुगीझांनी. १६ व्या शतकात त्यांचं सगळ्यात यशस्वी, २६ वर्षे भारत - पोर्तुगाल ट्रिपा करणारे जहाज बनले होते ते गोव्याच्या गोदीत! एव्हडं असून, ब्रिटिश भारतात स्थिरावले, पण पोर्तुगीझ गोव्याचा प्रदेश सोडून कुठे राहिले नाहीत. याच कारण म्हणजे १०० वर्षांची आघाडी मिळालेली असताना त्यांनी व्यापारापेक्षा धर्मप्रसाराचे उद्योग जास्त केले.. (आणि त्यासाठी त्यांना शिवाजी आणि संभाजी महाराज, दोघांनी चांगलेच ठोकून काढले!) . या उलट इंग्रजांनी फक्त पैसे कमवायचे उद्योग केले.. 'जो पैसे आणि सवलती देईल तो आपला' अशी दृष्टी ईस्ट इंडिया कंपनीनी ठेवली म्हणून ती फोफावली आणि पुढे इंग्रजांचे राज्य आले. त्या 'कंपनी' बद्दलही सध्या खूप वाचतोय..अत्यंत इंटरेस्टिंग कामाची पद्धत होती त्यांची. त्याबद्दल पुन्हा कधीतरी.. आश्चर्य असं वाटतं आपले दक्षिणी राजे ही समुद्र प्रवासात अग्रणी होते. पूर्वेकडे त्यांचा व्यापार युरोपियनांच्या कितीतरी आधीपासून सुरु होता..लोथल बंदरा मधून व्यापार हजारो वर्षे अरेबियाच्या दिशेनी होत होता.. पण आपल्याला माहिती अगदी त्रोटक.. जवळ जवळ शून्यच.. असो.. पुढच्या काही दिवसात इतिहास सोडून लिस्बन बद्दल लिहीन. आपल्यापैकी फार लोक येत नाहीत इथे.. त्यामुळे बहुधा नवीन वाटावं!!!

लिस्बनच्या शेवटच्या दिवशी 'मार्टीम मॉनिझ' नावाच्या भागात चालत गेलो होतो. परदेशात प्रत्येक मोठ्या शहरात एखादा इंडियन, पाकिस्तानी, बांग्लादेशींनी भरलेला भाग असतोच. जसं लंडन मध्ये हॅन्स्लोव, साऊथ हॉल, तर व्हाईट चॅपल, बेथनॉल ग्रीन या भागात बांगला देशाचं वर्चस्व.. दुबईत कामगार वस्तीचा सोनापूर, पॅरिसमध्ये गेअर द नॉर्द च्या शेजारच्या गल्लीतला 'ल चॅपल' स्टेशन पर्यंतचा भाग, सिंगापूरचा लिटल इंडिया आणि गेलँग भाग, हाँगकाँगच्या कौलून च्या टोकाचा नॅथन रोडवरच्या 'चुंगकिंग मॅन्शन'... तसाच हा लिस्बनचा 'मार्टीम मॉनिझ'.. या सगळ्या ठिकाणी या तिन्ही देशात अंगभूत असलेली बरीचशी अस्वच्छता, बेशिस्त असतेच पण प्रशासनानेही बहुधा हात टेकलेले असतात. कधीही गेलं तरी चिप बॉम्बर जॅकेट्स घालून, दोन्ही हात खिशात ठेवून टोळक्या टोळक्याने हिंडणारे तरुण दिसतात. यातले ९०% नीट व्हिसा घेऊन आलेले किंवा राहिलेले नाहीत हे ही उघड असतं! ते काय काम करतात, अश्या महागड्या देशात कसे जगतात हा प्रश्नच असतो. मी वेळ मिळाला की जातो अश्या ठिकाणी हिंडायला.. यात बहुतांश UP, बिहार, पंजाब, दिल्ली इथून आलेले तरुण जास्त असतात. इथे येताना त्यांच्या

कल्पना काय असतात कोण जाणे! शिक्षण बहुधा नसतंच. रोम, मिलन, अँटवर्प सारख्या शहरांच्या रेल्वे स्टेशनच्या बाहेर अश्या तरुणांना मी खेळणी, भिरभिरे असला माल विकताना पाहिलं आहे. अश्या अड्ड्यांवर ते बसलेले असतात. कधी शेती बेतीची, ड्रायव्हिंगची कामे मिळतात पण त्यात पैसे फारच कमी.. मग एकेका खोलीत १२/१२ जण राहतात. बरेच जण वेश्यांचे दलाल, ड्रग्स, अवैध सिम कार्ड्स विकणे अश्या पिंजऱ्यात सापडतात. तुरुंगात जातात.. या 'परदेशी' स्वप्ना पोटी त्यांच्या आयुष्याची वाट लागलेली असते. काही थोडे कमालीचे कष्ट करून त्यातूनही थोडे पैसे घरी पाठवायचे स्वप्न बघत असतात. त्यांना सांगावंसं वाटतं कि 'अरे पुढे काय? काही भवितव्य आहे का इथे?' 'असं इथे राहण्यापेक्षा आपल्या देशात जा. तिथे एवढे कष्ट केलेत तर नक्की ४ पैसे जास्त मिळतील'.. पण त्यांचे परदेशाचे स्वप्न काही केल्या मोडता येत नाही.. असाच एकदा हाँगकाँगच्या चुंगकिंग मॅन्शन मध्ये गेलो होतो. तिथे काही भारतीय, इजिप्शिअन, बांगलादेशी पाकिस्तानी ४/४ टेबलांचीच हॉटेल आहेत. संध्याकाळी काम झाल्यावर डाळ/भात स्वस्तात चांगला देतात म्हणून मी तिथे बरेच वेळा जातो. एका टेबलावर एक मुलगा साधेच जेवत होता. बऱ्या घरचा असावा. जागा नव्हती म्हणून त्याच्याच समोर बसलो. तो जे जेवत होता तेच मी पण मागवलं. जेवण झाल्यावर मालकाने त्याच्या कडून बिलाच्या निम्मेच पैसे घेतले. हळूच मालकाला विचारले का? तर म्हणाला कि नोकरी नाहीये त्याला. मिळेल ते काम करतो. आम्ही सगळेच त्याला जमेल ती मदत करतो. दुसऱ्या दिवशी परत तो मुलगा भेटला. मी मुद्दाम त्याच्या जवळ बसलो आणि म्हणले काय करतोस?

इथे फिल्म युनिट्स येतात शूटिंगला तिथे मिळेल ते काम करतो. चार वर्षे तो मुलगा स्ट्रगल करत होता. आणि अजूनही परत जायचा विचार नव्हता. मला आणखीन चार वर्षांनी सुद्धा तो असाच अर्धे पैसे देऊन जेवताना दिसला. त्या मानाने इंग्लंड, दुबई, सिंगापूर इथलं अवैध इमिग्रेशन अवघड आहे त्यामुळे तिथे नीट लाखो रुपये फिया भरून मुले जातात आणि याच सापळ्यात अडकतात.. एकच बर वाटलेलं निरीक्षण म्हणजे अश्या उनाड टोळक्यांच्यात मला मराठी मुले, किंवा एकंदरीतच दक्षिण भारतीय कमी दिसलेले आहेत. इथे भरणा जातो तो उत्तरेतला.

हि मुलं कशीतरी पैसे जमवून, जमिनी विकून जातात. व्हिसा संपल्यावर अवैधपणे धोके पत्करून लपून तिथे राहतात.. त्यातल्या किती जणांची स्वप्ने खरी होतात ते माहिती नाही पण टक्का फार कमी असावा. मग एखाद्या दिवशी ट्रम्प ऑर्डर काढतो आणि बेड्या घालून परत पाठवून देतो.

- मार्टीम मॉनिझ मध्ये हिंडताना सुरु झालेलं विचार चक्र!

## विदेशात जाताय, काळजी घ्या

**विदेशात नोकरीचे आमिष, महिलेची फसवणूक**

सकाळ, पिंपरी (०६-०३-२०२५) : विदेशात नोकरी देतो, असे सांगत रजिस्ट्रेशन फी, व्हेरिफिकेशन, व्हिजा आणि इतर वेगवेगळ्या कारणांसाठी महिलेकडून २९ लाख ९७ हजार ७६८ रुपये घेत नोकरी न देता फसवणूक केली. ही घटना २६ नोव्हेंबर २०२३ ते मार्च २०२५ या कालावधीत नेहरूनगर, पिंपरी येथे घडली. हर्ष मिश्रा, शिवांश पटारीया, अविनाश मिश्रा यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी ३४ वर्षीय महिलेने ४ मार्च २०२५ रोजी संत तुकारामनगर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. आरोपींनी फिर्यादी महिलेचे प्रोफाइल नोकरी डॉट कॉमवर पाहिल्यावर त्यांना नोकरीची ऑफर असल्याचे सांगितले. महिलेकडून रजिस्ट्रेशनसाठी आठ हजार ५०० रुपयांची मागणी केली. त्यानंतर महिलेने तिच्या वडिलांसाठी युकेमध्ये जॉब असून त्यासाठी रजिस्ट्रेशन फी, कागदपत्रे व्हेरिफिकेशन फी, व्हिजा फी, व्हिजाचे नियम बदलले असल्याचे सांगत कन्व्हरजेन चार्जेस, कंपनीचे सिक्युरिटी डिपॉझिट, कंपनीचा आयडी तयार करायचा आहे, अशी काही कारणे देत पैशांची मागणी केली. त्यानंतर, काही कारणांमुळे युके ऐवजी ऑस्ट्रेलियामध्ये नोकरी असल्याचे सांगून आणखी पैसे घेत आरोपींनी फसवणूक केली.

# अमेरिका में महत्वपूर्ण भारतीय

वर्षों के दौरान, भारतीयों और भारतीय मूल के दिग्गजोंने अमेरिका के सभी क्षेत्रों में महान योगदान दिया है, कई भारतीय अमेरिकन अपने बलबुतेपर महत्वपूर्ण जिम्मेदारियाँ निभा रहे हैं। १३० से अधिक भारतीय-अमेरिकियों को अमेरिका में विभिन्न विभागों और एजेंसियों में प्रमुख पदों पर नियुक्त किया गया है। यह एक ऐतिहासिक मील का पत्थर है और भारतीय-अमेरिकी समुदाय के अमेरिकी सार्वजनिक सेवा में बढ़ते प्रभाव को दर्शाता है। भारतीय-अमेरिकियों को पूर्व राष्ट्रपति जो बाइडेन के तहत प्रमुख पदों पर महत्वपूर्ण जिम्मेदारियां दी गयी थी। कई अमेरिकी भारतीयों को वर्तमान राष्ट्रपति डोनाल्ड ट्रंप के तहत भी महत्वपूर्ण पदों पर नियुक्त किया गया है। यहाँ कुछ उल्लेखनीय लोग हैं:

- Kash Patel – FBI Director, Trump Govt.
- Neera Tanden - Director of the White House Office of Management and Budget.
- Dr. Vivek Murthy - Surgeon General of the United States.
- Vanita Gupta - Associate Attorney General.
- Dr. Ashish Jha - Senior Advisor on COVID-19.
- Sonia Aggarwal - Advisor on Climate Policy.
- Kiran Ahuja - Director of the Office of Personnel Management.
- Rahul Gupta - Director of the Office of National Drug Control Policy.
- Vinay Reddy - Speechwriter.

अमेरिका में कई सफल भारतीय उद्यमी हैं जिन्होंने विभिन्न उद्योगों में महत्वपूर्ण योगदान दिया है। न केवल इन व्यक्तियों ने अपने-अपने क्षेत्रों में बड़ी सफलता हासिल की है, बल्कि उनकी दृढ़ता और रचनात्मकता की कहानियों ने कई लोगों को प्रेरित किया है। यहाँ कुछ उल्लेखनीय हैं:

- Shree Thanedar – Businessman, Author and Politician, Michigan
- Satya Nadella - CEO of Microsoft.
- Sundar Pichai - CEO of Google and Alphabet Inc.
- Sabeer Bhatia - Co-founder of Hotmail.
- Vinod Khosla – Co Founder of Sun Microsystem, Founder of Khosla Ventures.
- Ajay Bhatt - Co-inventor of USB.
- Padmasree Warrior - Founder and CEO of Fable.
- Shantanu Narayen - CEO of Adobe Systems.
- Jay Chaudhry - CEO of Zscaler.
- Aneel Bhusri - CEO and Co-founder of Workday Inc.
- Jayshree Ullal - President and CEO of Arista Networks.
- Vikram Pandit – Former CEO of Citigroup and Boeing
- Farid Zakaria – Editor at Large, TIME Magazine
- Nitin Noharia – Dean, Harvard Business School
- Gururaj "Desh" Deshpande – Venture Capitalist, Co Founder Sycamore Networks
- Naveen Jain - Founder of Moon Express and InfoSpace.
- Kumar Malavalli - Co-founder of Brocade Communications Systems.
- Shashi Ranjan - Founder of Yatra.com.
- Rajat Gupta - Former Managing Director of McKinsey & Company.
- Anil Agarwal - Founder of Vedanta Resources.
- Mohanbir Sawhney - Professor at Northwestern University and author.
- Rajiv Laroia - Co-founder of Qualcomm.
- Rajeev Suri - Former CEO of Nokia.

- Amit Chaudhary - Founder of AppDynamics.
- Rakesh Gangwal - Co-founder of IndiGo Airlines.
- Vivek Ranadivé - Founder of TIBCO Software and owner of the Sacramento Kings.
- Kris Gopalakrishnan - Co-founder of Infosys.
- Nikesh Arora - CEO of Palo Alto Networks.
- Shantanu Narayen - CEO of Adobe Systems.
- Rajesh Rao - Co-founder of Tejas Networks.
- Rajeev Ram - Co-founder of iRobot.
- Sanjay Mehrotra - Co-founder of Micron Technology.
- Rajesh Gopinathan - Former CEO of TCS.
- Ajeet Singh - Founder of ThoughtSpot.
- Ravi Jakhotia - Co-founder of Mphasis.
- Sudheer Somana - Founder of Cognizant.
- Rajesh Kailas - Founder of Molex.
- Vivek Shah - CEO of Ziff Davis.
- Rajeev Ram - Co-founder of iRobot.
- Sanjay Mehrotra - Co-founder of Micron Technology.
- Rajesh Gopinathan - Former CEO of TCS.
- Ajeet Singh - Founder of ThoughtSpot.
- Ravi Jakhotia - Co-founder of Mphasis.
- Sudheer Somana - Founder of Cognizant.
- Rajesh Kailas - Founder of Molex.

इन उद्यमियों ने प्रौद्योगिकी, स्वास्थ्य देखभाल, वित्त सहित विभिन्न उद्योगों में महत्वपूर्ण योगदान दिया है। उनकी सफलता की कहानियाँ वास्तव में प्रेरणादायक हैं।

## REDIO - Rescuing Every Distressed Indian Overseas

परराष्ट्र मंत्रालयाचे माजी राजदूत आणि सचिव आणि सध्या राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाचे सदस्य माननीय डॉ. ज्ञानेश्वर मुळे यांच्या नेतृत्वाखाली आणि मार्गदर्शनाखाली मूव्हमेंट ऑफ पॉझिटिव्हिटीचा हा उपक्रम आहे. विविध कारणांमुळे संकटात सापडलेल्या परदेशी भारतीयांना मदत करणे हे रेडिओचे उद्दिष्ट आहे. सौ.धनश्री पाटील या REDIO या संस्थेच्या CEO आहेत. तीन कोटींहून अधिक भारतीय परदेशात वास्तव्यास आहेत. त्यापैकी मोठ्या संख्येने भारतीय नागरिकत्व आहे. नोकरदार/ नियोक्त्यांकडून होणारी फसवणूक किंवा गैरवर्तन, इमिग्रेशन समस्या, पासपोर्ट व्हिसा फ्रॉड, गमावलेल्या नोकऱ्या, वैद्यकीय आणीबाणी, किरकोळ गुन्हे, तुरुंगवास किंवा नजरकैदेत ठेवणे आणि इतर कायदेशीर गुंतागुंत यामुळे यातील अनेक जण अडचणीत सापडतात.

REDIO
RESCUING EVERY DISTRESSED INDIAN OVERSEAS
M.: +91 95031 07419
Email : redio.help@gmail.com

भारत सरकार त्यांना आयसीडब्ल्यूएफच्या माध्यमातून सक्रिय पणे मदत करत आहे. मात्र, परदेशातील भारतीयांमध्ये सरकारी मदत, मदत आणि भारतीय दूतावासांशी संपर्क कसा साधावा याविषयी जागरुकता कमी आहे. शिवाय अशा काही गोष्टी आहेत ज्या दूतावास किंवा वाणिज्य दूतावास नियम आणि कायद्यांमुळे करू शकत नाहीत. अशा प्रकरणांमध्ये, रेडियो अशा लोकांचे सहयोगी नेटवर्क तयार करून मदत करण्याचा प्रयत्न करीत आहे जे आधीच इतरांना मदत करण्यासाठी त्यांच्या ट्रॅक रेकॉर्डसाठी ओळखले जातात. रेडियो ही २० सक्रिय सल्लागारांसह सर्व खंडांमध्ये पसरलेली एक जागतिक संघटना आहे. ही संस्था परदेशातील संकटग्रस्त भारतीयांचे समुपदेशन करणारी एक छत्री संस्था म्हणून उदयास आली आहे जी भारतातील स्थानिक सरकार, भारत सरकार आणि संबंधित राज्यांशी समन्वय साधते. आरईडीओ हा भारत सरकारच्या प्रयत्नांचे कौतुक करण्यासाठी परदेशातील संकटग्रस्त भारतीयांना मदत करण्याचा नागरी समाजाचा प्रयत्न आहे.

# भारतातील घुसखोर - प्रश्न व संभाव्य उपाय

अमेरिकेने आपल्या देशात अवैध रित्या राहत असलेल्या १०० पेक्षा जास्त देशांच्या नागरिकांना बाहेर काढायला सुरवात केली आहे. जर्मनी मध्ये आलेले निर्वासित जर्मनीसाठी आता एक मोठी समस्या होऊन बसले आहेत. हीच स्थिती इतर युरोपिअन देशात बघायला मिळते. भारतात हि समस्या आहेच, परंतु आता यापुढे वेळकाढूपणा करणे अत्यंत धोक्याचे ठरणार आहे. भारत सरकारने घुसखोरांना तातडीने बाहेर काढण्यासाठी कारवाई सुरु केली पाहिजे. उपराष्ट्रपती जगदीश धनकर यांनी देखील याबद्दल स्पष्ट शब्दात विचारले आहे.

**समस्याः**

* **अवैध स्थलांतरः** बांगलादेशातून मोठ्या प्रमाणात लोक अवैधरित्या भारतात स्थलांतरित होतात. हे स्थलांतर अनेकदा आर्थिक आणि राजकीय कारणांमुळे होते.
* **सुरक्षा धोके:** अवैध स्थलांतरितांमुळे देशाच्या सुरक्षेला धोका निर्माण होऊ शकतो. काही स्थलांतरित गुन्हेगारी कृत्यांमध्ये सामील होऊ शकतात.

सामाजिक आणि आर्थिक परिणामः स्थलांतरितांमुळे स्थानिक लोकांवर सामाजिक आणि आर्थिक दबाव येऊ शकतो. त्यामुळे स्थानिक लोकांच्या रोजगारावर आणि संसाधनांवर परिणाम होऊ शकतो.

* **राजकीय अस्थिरताः** या मुद्द्यामुळे राजकीय अस्थिरता निर्माण होऊ शकते. राजकीय पक्ष या मुद्द्याचा वापर राजकीय फायद्यासाठी करू शकतात.

**उपायः**

* **सीमा सुरक्षाः**
  सीमा सुरक्षा दलाने सीमेवर गस्त वाढवणे आवश्यक आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून सीमेवरील अवैध हालचालींवर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे.
* **कायदेशीर उपायः**
  अवैध स्थलांतरितांना शोधणे, ताब्यात घेणे आणि त्यांना त्यांच्या देशात परत पाठवण्याचा अधिकार सरकारला आहे. छठउ (राष्ट्रीय नागरिक नोंदणी) च्या माध्यमातून अवैध स्थलांतरितांना ओळखणे.
* **आंतरराष्ट्रीय सहकार्यः**
  बांगलादेश सरकारसोबत संवाद साधून स्थलांतरितांना परत पाठवण्याची प्रक्रिया सुलभ करणे आवश्यक आहे. आंतरराष्ट्रीय संस्थांची मदत घेणे.
* **सामाजिक उपायः**
  स्थानिक लोकांमध्ये आणि स्थलांतरितांमध्ये संवाद वाढवणे आवश्यक आहे. स्थलांतरितांच्या समस्या समजून घेणे आणि त्यांना मदत करणे आवश्यक आहे.
* **आर्थिक उपायः**
  बांगलादेशात आर्थिक विकास घडवून आणणे. हा मुद्दा थोडा अतार्किक वाटेल. पण जर त्या राज्यात थोडेफार आर्थिक राजकीय स्थैर्य आले तर कदाचित भारतात होणारे अवैध स्थलांतर कमी होऊ शकेल.
* **राजकीय उपायः**
  राजकीय पक्षांनी या मुद्द्यावर एकजूट दाखवणे आवश्यक आहे. राजकीय फायद्यासाठी या मुद्द्याचा वापर टाळणे आवश्यक आहे.
  या उपायांच्या अंमलबजावणीमुळे भारतातील बांगलादेशींची समस्या कमी होऊ शकते.

# रिमोट वर्किंग - डिजिटल नोमॅड व्हिसा

तुम्हाला जर तुमच्या कंपनीने रिमोट वर्किंग साठी परवानगी दिली असेल आणि तुम्हाला भारताबाहेर राहून तुमच्या भारतातल्या कंपनी बरोबर काम करण्याची इच्छा असेल तर भारतीय पासपोर्ट होल्डर साठी एक आनंदाची बातमी आहे. जगातील १६ देशात हातात तुम्ही नोमॅड व्हिसा घेऊन तिथे राहून काम करू शकता.

क्रोएशिया, जर्मनी, इटली, थायलंड, ग्रीस, इंडोनेशिया, रोमेनिया, माल्टा, एस्टोनिया, न्यूझीलंड, कोस्टारिका, सेशेल्स, स्पेन, बहामाज, पोतुगाल आणि हंगेरी या देशात तुम्ही नोमॅड अथवा फ्री लान्स व्हिसा घेऊन राहू शकता. अर्थात प्रत्येक देशाची स्वतःची व्हिसा प्रोसेस करण्याची यंत्रणा, नियम वगैरे आहेच. पण कायदेशीर रित्या तुम्ही या सोळा देशात जाऊन राहू शकता. जर्मनीत राहण्यासाठी वार्षिक दिड लाखापेक्षा कमी पगार असेल तरी व्हिसा मिळतो, अर्थात जर्मनीत राहण्याचा खर्च तुम्हाला परवडला पाहिजे. तसे बघायला गेले तर सध्या व्हिएतनाम मध्ये राहणे सगळ्यात स्वस्त आहे असे दिसते. आणि भारताबाहेर जाऊन राहायचे नसेल तर भारतात राहून रिमोट वर्किंग साठी तर खूपच सुंदर पर्याय उपलब्ध आहेत. अगदी मुंबई पुण्याच्या जवळ देखील आहेत, हिमाचल किंवा आसाम अरुणाचल प्रदेश पर्यंत छान पर्याय उपलब्ध आहेत. मग, करताय का विचार ?

# कुठेही रहा, डॉलरमध्ये कमवा - महत्वाच्या साईट्स

आजच्या आधुनिक जगात, तुम्ही तुमच्या घरातुन किंवा जगभरातील कुठूनही यु.एस.डॉलर मध्ये कमाई करू शकता. परकीय चलन कमावण्यासाठी तुम्हाला आता यु.एस./ कॅनेडियन/ ऑस्ट्रेलियन/ जर्मन व्हिसाची आवश्यकता नाही आणि डॉलर कमावण्यासाठी परदेशात प्रवास करण्याची आवश्यकता नाही.

खाली २० विश्वसनीय साइट्स आहेत ज्या तुम्हाला रिमोट जॉब मिळण्यासाठी मदत करू शकतात.

1. JustRemote – Find top remote and hybrid roles.
   https://justremote.co/
2. Wellfound by AngelList – Discover startup and tech jobs (no cover letter needed).
   https://wellfound.com
3. Working Nomads – Remote jobs for digital nomads.
   https://lnkd.in/gN5Xpkcq
4. Remote – Access jobs from across the globe.
   https://remote.com
5. oDesk Work – Ideal projects for your skills.
   https://odeskwork.com
6. Job Board Search – Find top remote jobs in 200+ categories.
   https://jobboardsearch.com
7. JS Remotely – Specializes in remote JavaScript jobs.
   https://jsremotely.com
8. Remote.co – Browse local remote job opportunities.
   https://remote.co
9. Remote OK – Find remote jobs quickly and easily.
   https://remoteok.com
10. Himalayas – Explore 100+ categories of remote jobs.
    https://himalayas.app
11. We Work Remotely – List and discover amazing remote jobs.
    https://weworkremotely.com
12. FlexJobs – Offers flexible and remote job opportunities worldwide.
    https://flexjobs.com
13. Fiverr – Start earning by creating freelance gigs.
    https://fiverr.com
14. Upwork – A variety of projects with free membership.
    https://upwork.com
15. Freelance Writing – Tailored for writers seeking job opportunities.
    https://lnkd.in/gbGAizuH
16. Freelancer – Ideal for beginners in web and graphic design or writing.
    https://freelancer.in
17. Indeed – Apply easily with Indeed's auto-apply feature.
    https://in.indeed.com
18. Outsourcely – Find part-time or full-time jobs in various fields.
    https://outsourcely.com
19. Problogger – Best for ghostwriters, bloggers, and content writers.
    https://problogger.com
20. LinkedIn – Land jobs matching your skills at leading companies.
    https://linkedin.com

शुभेच्छा!

Vishwa Panthastha CR No MAHBIL/2018/69261

Unlock limitless potential

# Simplify and Scale with ElintOm




Discover how ElintOm can transform your business!
Contact us today to learn more.

## Our Offices

**USA**
1123 Tamworth Hill Ln
Cary NC 27519
**Phone:** +1 919-601-9626

**EMEA**
Swasthe Middle East LLC
Shams Business Centre, Sharjah Media City
United Arab Emirates.
**Phone:** +971-543792500

**INDIA**
#8, Neelprabha Appt, RT Bhusari Colony, Kothrud Depot, Pune-411038.
**Phone:** +91 90044 59995